# मेट्रोच्या भुयारीकरणाचे काम वेगाने

मुंबई : येथे झालेल्या टनेलिंग एशिया २०१९ या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे प्रकल्प संचालक सुबोधकुमार गुप्ता यांनी मेट्रो-३ या मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रो प्रकल्पातील बांधकाम तंत्रज्ञान, पर्यावरण संवर्धन व सुरक्षेविषयी माहिती दिली. टनेलिंग असोसिएशन ऑफ इंडिया, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन, केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळ आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परिषदेचे आयोजन केले होते.